# विनीत बाजपेयी

# विध्वंसक
# प्रलय

TreeShade Books

# दशावतार

दशावतार भगवान विष्णुची दहा रुपं दर्शवतात. हिंदु कथांनुसार भगवान विष्णुंनी पृथ्वीतलावर सर्वशक्तिमान अवतार धारण केले आणि वाईटावर चांगल्याचा प्रभाव वाढवला.

मत्स्य

(सर्व सृष्टीचा नाश करणारा सर्वशक्तिशाली मासा)

कुर्म

(समुद्रमंथनात अमृतासाठी मदत करणारे कासव)

वराह

(बुडणारी पृथ्वी वाचवणारे वन्य डुक्कर)

नृसिंह

(अजिंक्य असुराला ठार करणारा अर्धा सिंह आणि अर्धा मानव अवतार)

वामन

(दोन विश्व पुन्हा मिळवून देणारा छोटा ब्राह्मण)

परशुराम

(कुऱ्हाड घेऊन अत्याचारींचा नाश करणारा वीर ऋषी)

राम

(मर्यादा पुरुषोत्तम आणि अयोध्येचा राजा)

कृष्ण

(योद्धा, प्रेमी, वादक, राजकारणी, निर्माता, संरक्षक आणि विध्वंसक)

बुद्ध

(साक्षात्कारी)

कल्कि

(विष्णुचा शेवटचा अवतार, चमचमणारी तलवार घेतलेला.. ज्याच्या अवताराची प्रतीक्षा आहे. भयंकर रुप…)

# प्रस्तावना

‘ते सगळे मरणार आहेत.. आणि मीही त्यांच्यासोबत मरणार आहे.’ मनु स्वतःशी पुटपुटला.

*हे सगळेचजणं, तरूण स्त्री-पुरूष, त्यांची मुलंबाळं, वृद्ध असे सगळेजणं मरणार आहेत. ज्यांना मी संरक्षण करण्याचं वचन दिलं होतं ते सर्वजण एखाद्या किडामुंगीप्रमाणे मृत्युमुखी पडणार आहेत.*

मनुला आत्ता पहिल्यांदाच त्याच्या धाडसी निर्णयाचं गांभीर्य कळलं होतं. सत्याची कास धरून त्याचा निर्णय अमलात आणण्याची त्याची धडपड सुरू होती. त्याच्या समुद्री गुरुची आज्ञा पार पाडण्याच्या कामात तो आतापर्यंत पूर्णपणे मग्न होता.

वीस हजार दोरखंडांनी बांधलेलं आणि महाकाय झाडांच्या आधारानं उभारलेलं विशालकाय जहाज त्या तरूण नेत्यानं पाहिलं. समुद्रासारखं विशाल रूप धारण केलेल्या

नदीच्या भल्याथोरल्या लाटेच्या तडाख्यापासून मानवाचा बचाव करण्यासाठी ते जहाज उभारण्यात आलं होतं. महाप्रलयातून हे जहाज तरणार होतं.

*त्या महाप्रलयाला हे ठाऊक होतं का, की हे शेवटचं जहाज नक्की काय वाहून नेणार होतं?*

महाप्रलय येतोय, अंतिम प्रलय भयंकर असणार होता. काळोख्या रात्रीच्या पटावर जणू एखाद्या चित्रकाराने रंगवल्यासारखे  लाल-जांभळे ढग संपूर्ण पृथ्वीला गिळंकृत करणार होते. ढग जणू इंद्रदेवाचा कोपच दाखवून देत होते. प्रचंड गडगडाट आणि वादळी वारे, अमाप पाऊस अंत घेऊन येत होते. प्रचंड गारपीट होत होती, भल्यामोठ्या सुयांसारखे पाण्याचे बोचरे थेंब कोसळत होते, या माऱ्यामध्ये मनु आणि त्याचे साथीदार अडकले. आकाशातून पडणारा प्रत्येक थेंब त्वचेवर सुईसारखा टोचत होता. मनुच्या जहाजात उभे असलेले अनेक स्त्री-पुरुष स्वतःला तडाख्यातून वाचवायचा प्रयत्न करत होते. घाबरले होते. त्यांच्यासाठी ही नेहमीची नाव नव्हती.

हे अखेरचे जहाज होते. कुठल्याही बंदरातील अखेरचं जहाज नव्हे, तर त्या रात्रीचं अखेरचं जहाज निघालं होतं.

अशा प्रकारचं निर्मिलेलं एकमेव जहाज. खुद्द पृथ्वीची सुटका करण्यासाठी तयार करण्यात आलेली महाकाय नौका. त्या जहाजात होती पृथ्वीची निर्मिती.

महान योद्धा, पुजारी, तपस्वी, तत्वज्ञ आणि मनु राजाच्या निर्मितीचा सर्वोत्तम नमुना होता हा.

त्याचं जहाज.

मनुचं जहाज.

अत्यंत भीतीदायक संघर्षात हजारो स्त्री-पुरुष त्यातून प्रवास करत होते. दैवानेही कल्पना केली नसेल अशा प्रकारचं जहाज होतं ते. संपूर्ण पृथ्वीतलावर यापुढे कधीही निर्मिलं जाणार नाही अशी ती निर्मिती होती. आजच्या तारखेपर्यंत तशी निर्मितीही झाली नाही. मनुचं देदीप्यमान जहाज एखाद्या नगराएवढं होतं. मानवजातीचं संरक्षण एवढाच त्याचा उद्देश होता.

नैसर्गिक आपत्ती आणि मानवाची जिवंत राहण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती यातलं दार होतं ते जहाज. नष्ट होऊ पाहणारा प्रदेश ते नवी निर्मिती यांच्यातला पूल होतं ते जहाज. मानवजातीचा हा संघर्ष कायम लक्षात राहणार होता. हा संघर्ष केवळ पृथ्वीतलावर नाही, तर स्वर्गातही त्याची आठवण कायम राहणार होती. इतक्या मोठ्या संघर्षानंतरही, बरंच नुकसानही सोसावं लागणार होतंच. मानवानं प्राप्त केलेलं मौल्यवान आणि न वापरलेलं शहाणपण वेगवेगळ्या विश्वात प्रसारित होणार नव्हतं. ते याच ग्रहावरचं होतं. अनेक किमया, औषधं, हवाई प्रवास, शस्त्रास्त्र आणि अध्यात्म हे सर्व ज्ञान कायमचं अदृश्य होणार होतं. इतक्या मोठ्या जलप्रलयानंतर ते शक्तिशाली महासागराच्या तळाशी जाणार होतं.

आणि तरीही हे जहाज आर्यावर्ताचा शेवटचा आशेचा किरण होतं. तारे, आकाशगंगा आणि नक्षत्रांसारख्या देवाच्या गहन संकल्पनांनी माणसाला चकित केलं आहे. देवाच्या दिव्य कामगिरीचं प्रतीक म्हणून या सगळ्या सृजनांमध्ये निःसंशयपणे जीवन आहे. या भव्य, शांत, जीवनातही दुःख वेदनांचा जन्म आहे, त्यांच्यामुळे दुःख होतंच पण प्रेमही अमर्याद मिळतं. जे स्वतःला देवासमान कार्य करतात त्यांनी ही निर्मिती जतन करणे आवश्यक होतं.

*वरील सर्वांना वाचवणं आवश्यक होतं.*

मनुच्या सैन्याने जहाजाला बांधलेल्या जाड, मुरलेल्या, भिजलेल्या दोऱ्या आणि वेली कापताना स्वतःच्या बाहूंवर, मानेवर फारच वजन पेलले होते. जवळपास संपूर्ण नगरवासी जहाजात सामावले असताना, या सर्वांना सुखरूप नेण्यासाठी या सैन्याने स्वतःचं शरीर भयंकर श्रमवलं होतं, सगळा भार वाहताना त्यांची बोटं मोडून पडत होती, हातांचे स्नायू

फाटत होते. स्त्री-पुरुष आणि मुलं अशा सर्वांचा भार अकल्पनीय होता. नौकेवर पडणारा भार लाकडावरचा होता. पण सैन्यातला प्रत्येकजण हाडामांसाचा बनलेला होता. लाकूड, तांबं आणि दगडांनी बनलेलं जहाज अकल्पित वजन पेलण्यास सक्षम होतं. त्याचं शिड थेड आभाळाला भिडत होतं. सुमेरू पर्वतापेक्षा जहाज उंच होतं. दहा राजांच्या दशराजनांच्या मैदानापेक्षा ते विस्तीर्ण होतं.

मनु अस्वस्थ होत होता. त्यानं सर्वांना सूचना देणारं समुद्री शिंग फुंकलं. खराब परिस्थिती असेल तरच ते शिंग फुंकावं असा संकेत होता. आणि आता ती वेळ आली होती. त्याच्या लोकांच्या वेदनेपेक्षा आणखी मोठं काहीच नव्हतं. मनुने कातडी बाहीने अश्रू पुसले, मोठा श्वास घेतला आणि पुन्हा एकदा ते शिंग फुंकलं. ती अखेरची सूचना होती. जहाज प्रवासाला निघणार होतं.

लालसर झालेल्या आभाळाच्या विरोधात शिड नेण्यासाठी कोळशाचं यंत्र धगधगत होतं. मनुने पावसाचा मारा झेलण्यासाठी डोळ्यांवर कोपर आडवं धरलं, त्यानं दूरवर एक नजर टाकली. त्याला स्पष्ट काहीही दिसलं नाही. क्षणाक्षणाला पुढे जाण्याचा प्रयत्न तो घट्ट धरून ठेवू पाहात होता. स्वतःचे अश्रू रोखण्याच प्रयत्न करत होता आणि त्यानं पुन्हा एकदा शिंग फुंकलं. ते शिंग इतकं जोरात फुंकलं, की एखादा ड्रॅगन ओरडत उडावा तसा आवाज घुमला. तिथल्या प्रत्येकाला कानठळ्या बसाव्या इतका मोठा आवाज झाला.

मनुने पावसाचा मारा झेलत, दूरवरून लाटा दिसतायंत का ते पाहायचा प्रयत्न केला. खऱ्या रक्षणकर्त्याचं एकदा तरी दर्शन होतंय का हे पाहण्याचाही त्यानं पुन्हा पुन्हा प्रयत्न केला.

पण त्याला काहीही दिसलं नाही.

‘मत्स्या…’ मनु न राहवून चित्कारला. जहाजाच्या काठावर जाऊन तो मनापासून ओरडला. त्याच्या डोळ्यात आशा होती, कुठूनतरी आपल्या लाडक्याचं दर्शन होईल अशी दुर्दम्य आशा त्याच्या डोळ्यात होती. तो बाहेर पाहातच राहिला. पावसाचा मारा सहन करत त्याची नजर अद्याप बाहेर होती. जणू पावसाच्या माऱ्यात तो धाय मोकलून

रडून घेत होता. अनैसर्गिक वादळाशी त्याला लढता येईल का, अशी शंका अद्याप त्याच्या मनात होती.

त्याचे पिता - विवस्वान पुजारींनंतर त्यांची जागा त्यानं मत्स्याला वाहिली होती. पण त्यानं फसवलं होतं का? मनुचा मित्र, मार्गदर्शक, समुपदेशक, धीर देणारा… त्यानं फसवलं होतं का?

त्यानं प्रेम केलं त्या मत्स्यानं फसवलं होतं का?

'मस्त्या....' मनु आणखी जोरात ओरडला. त्याचे बाहू पूर्णपणे मिठी मारण्यासाठी आसुसले होते, तो मनापासून बोलवत होता, स्वर्गातही त्याची हाक ऐकू जावी, यासाठी तो ओरडत होता.

इतक्यात त्यानं पाहिलं.. त्या लाटांवर स्वार झालेला, हो त्यानं पाहिलं.

लोकनास, सर्वात मोठा समुद्री प्राणी, ज्या समार्थ्यवान ब्रह्मानेही कल्पना केली नसेल अशा आकाराच्या प्राण्याचं डोकं त्यानं दूरवर लाटांमध्ये पाहिलं. मनुने आज पहिल्यांदा ही भलीथोरलवी पशूची आकृती पाहिली होती.

हो. तोच होता तो. त्या राक्षसी पशूच्या बरोबर मध्यभागी तो उभा होता. निडरपणे.

*मत्स्य.*

## रोमजवळ कुठेतरी, 2017

# ‘हा तोच आहे.. अशी खात्री आहे तुझी?’

आज बिग मॅनची नेहमीपेक्षा जास्त चिडचिड झाली होती. बाहेर लोक त्यांचं दर्शन घ्यायला ताटकळले होते. रोमजवळच त्यांचं वास्तव्य होतं. तिथल्या लोकांना दर्शन द्यायला ते ठरावीक वेळेला बाहेर पडायचेच; पण, आज एक फोन आला आणि सारं बिनसलं. फोनमुळे बिग मॅनना आवरायला उशीर झालाच; पण त्याहीपेक्षा म्हणजे ते कमालीचे अस्वस्थ झाले होते. आता निघता निघता चहाचा कप ओठाला लावतानाही त्यांचा हात किंचित थरथरत होता.

एखाददुसऱ्या देशाने नाही तर, संपूर्ण पृथ्वीतलावरच्या बहुतांश लोकांनी त्यांचं श्रेष्ठत्व मान्य केलेलं होतं. देवाचं वरदान लाभलेली सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणून लाखो-करोडो लोक त्यांच्या पायावर लोळण घ्यायचे. त्यांचा वरदहस्त आपल्याही डोक्यावर राहावा म्हणून प्रयत्न करायचे. बिग मॅन हे केवळ दोन शब्द नव्हते, ती एक शक्ती होती. त्यांच्या एका शब्दावर आण्विक युद्धही होऊ शकले असते, त्यांच्या एका इशाऱ्यावर रक्तरंजित युद्ध संपुष्टात येऊ शकलं असतं.

जगावर नियंत्रण ठेवणाऱ्या बिग मॅनला आज एका सर्वसाधारण माणसाने अस्वस्थ केलं होतं खरं. बिग मॅननी चहाचा कप टेबलावर आदळला आणि तेवढ्यात एक कनिष्ठ धर्मोपदेशक आत आले. बिग मॅनची जळजळीत नजर त्यांच्यावर पडली आणि ते जागीच थिजले. पण त्यांना बोलणं क्रमप्राप्त होतं. खाली हजारो लोक बिग मॅनच्या दर्शनासाठी उभे होते. आज दर्शनाची वेळ चुकली होती, त्याचीच आठवण करून द्यायला धर्मोपदेशक आत आले होते. बिग मॅननी नुसत्या खुणेने त्यांना वाट पाहायला सांगितलं.

बिग मॅनना सिगरेट ओढायची तलफ वाटू लागली होती, कदाचित त्यानेच डोकं ठिकाणावर आलं असतं. त्यांच्या डोक्यात नुसते संभाषणाचे विचार सुरू होते.

तो अवतरणार होता. होय, सामना होणार होता, तोही तब्बल 1600 वर्षांनंतर. हे होणार आहे याची भविष्यवाणी खुद्द बिग मॅननेच वर्तवलेली असली, तरी तो काळ समीप आला आहे या जाणिवेनेच त्यांना कमालीचं अस्वस्थ वाटत होतं. ही बिग मॅनच्या सोनेरी इमल्यांना धक्का देणारी अर्थातच सर्वात वाईट बातमी होती.

*रेगला फोन करायलाच हवा, बिग मॅन स्वतःशीच पुटपुटले.*

‘गुड मॉर्निंग, अं.. तुमचा फोन..’ तद्दन इटालियन उच्चारांत फोनवर पलीकडून शब्द उमटले. रेग मारियानीचा आवाज होता तो.

‘सर, तुम्ही का कष्ट घेतलेत.. अहो, मी येतंच होतो तुमच्याकडे..’ रेगच्या आवाजातली अजिजी लपत नव्हती. खरंतर फोनवर बोलतानाही त्याला घाम फुटला होता.

बिग मॅन काय चीज आहे हे फारच कमी लोकांना ठाऊक होतं आणि रेग त्यांच्यापैकीच एक होता. म्हणूनच त्याला फोनवर बोलतानाही प्रचंड टेन्शन आलं होतं. कारण जगातल्या सर्वात शक्तिमान आणि सर्वात धोकादायक धार्मिक नेत्याशी तो बोलत होता याची त्याला पुरेशी जाणीव होती.

‘रेग, काम पार पडलंय?’ बिग मॅनने अत्यंत थंड आवाजात विचारलं.

‘सर, अजून नाही.’

‘मग इथे काय पान वाढून ठेवलंय तुझं?’

रेग क्षणभर काहीही बोलू शकला नाही.

‘अं..सर,’ रेग शब्दांची जुळवाजुळव करत होता. एवढं बोलतानाही त्याला घसा खाकरावा लागला होता.

सर्वश्रेष्ठ बिग मॅनला आता रेगशी बोलण्यात काहीही रस नव्हता.

‘रेग, तुझ्यावर एक काम सोपवलंय. ते पूर्ण होईल तेव्हाच इकडे ये.’

‘हो, सर..’

बिग मॅनचा प्रत्येक शब्द ठाम होता. त्यांच्या आवाजात कुठलेही चढउतार नसले, तरी राग, आज्ञा, अवहेलना असं बरंच काही ठासून भरलेलं होतं. बिग मॅनचा हुकमी आवाजच समोरच्याला गारद करायला पुरेसा असायचा. रेगचा हा काही पहिला अनुभव नव्हता.

रेग मनातल्या मनात भीतीचा आवंढा गिळत असतानाच, त्याला पलीकडून बिग मॅनचा आवाज ऐकू आला, ‘मासकेरा बियांकाला जरा आठवण कर.. त्याला म्हणावं, त्याचं अस्तित्व माझ्या कृपेवर आहे हे तो विसरला नाहीये ना. जमेल नं तुला एवढंतरी करायला?’

‘अं...हो.. सर’

‘तो आमची जास्तीत जास्त सेवा करणार आहे असं म्हणाला होता. त्यामुळेच त्याची पापं धुतली जातील. हे जर का तो विसरणार असेल तर या जगात त्याला स्थान नाही..’

रेग अक्षरशः थिजला. युरोपातल्या सर्वात भयंकर माफियाला असा निरोप फक्त बिग मॅनच पाठवू शकतो. रेगच्या कानात बिग मॅनचे शब्द घुमत होते. इतक्यात त्याला पलीकडून फोन कट केल्याचा आवाज आला. त्याने हातातच रिसिव्हर ठेवून सुटकेचा नि:श्वास टाकला.

बिग मॅनच्या अपेक्षा पूर्ण न करू शकणाऱ्यांचं काय होतं हे रेगला चांगलंच ठाऊक होतं. रेग अनेक वर्ष बिग मॅनसाठी काम करत होता. पण त्याला अगदी पहिल्या दिवसापासूनच कधीच सुरक्षित वाटलेलं नव्हतं.

रेगने स्वतःला सावरत फोन खाली ठेवला. काही क्षण गेले आणि फोन पुन्हा खणाणला. रेगच्या हृदयाचे ठोके पुन्हा वाढले. त्याने फोन उचलला. होय, पुन्हा बिग मॅनच होता पलीकडे. पण रेगला आताच्या आवाजात काहीतरी फरक जाणवला. बिग मॅनचा मघासचा व्यवहारी, कठोर आवाज जाऊन आता त्या आवाजात किंचित कंप जाणवत होता.

रेगने फोनचा रिसिव्हर कानाला घट्ट लावला आणि तो ऐकायला लागला,

‘रेग तुला काय वाटतं? हा देवता असेल का? भविष्यवाणीमध्ये वर्णन असलेला हा तोच मुलगा असेल का?’

‘हो, सर, मला वाटतंय हा तोच आहे.’ रेगने स्पष्ट सांगून टाकलं. कारण शब्दांचा कीस पाडलेला बिग मॅनला रुचलाच नसता. त्यानं बिग मॅन काही म्हणतोय का याची क्षणभर वाट पाहिली आणि तो पुन्हा प्रत्येक शब्दावर जोर देऊन म्हणाला, *‘देवताचं पुनरागमन झालेलं आहे...’*